पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
शासन निर्णय कृकमा- ०५२६/प्र.क्र. १०१/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९.१०.२०२६

संदर्भ :-
१. शासन निर्णय क्र. कृकमा- ०५२६ /प्र.क्र. ९३/का. २-स, दि ०२.०६.२०२६.
२. शासन पुरकपत्र क्र. कृकमा-०५२६ /प्र.क्र.९३/का. २-स, दि. १५.०७.२०२६.
३. शासन निर्णय, क्र. कृकमा-०५२६ /प्र.क्र.९३/का. २-स, दि. २२.०७.२०२६.
४. शासन निर्णय क्र. कृकमा-०५२६ /प्र.क्र.९३/का. २-स, दि. ३०.०७.२०२६.
५. शासन निर्णय क्र. कृकमा-०५२६ / प्र.क्र.९३ / का.२-स, दि. १९.०८.२०२६.
६. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे पत्र क्र.कृषीपत-१५/कर्जमाफी/निधी मागणी/२०२६, दि. २२.०९.२०२६.
७. शासन निर्णय क्र.कृकमा.०५२६/प्र.क्र.९३/का.२-स, दि.२९.०९.२०२६
८. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे पत्र क्र.कृषीपत-१५/कर्जमाफी/निधी मागणी/४००० कोटी/२०२६/२३३४, दि. २१.१०.२०२६.

प्रस्तावना :-

मा. मंत्रिमंडळाच्या दि. ०२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ ही योजना जाहिर करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र. २ च्या शासन पुरक पत्रान्वये सदर योजनेच्या निकषामध्ये अंशत: बदल करण्यात आले आहेत.

२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये पुरवणी मागणीव्दारे रु. २०,५५२.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र. ३ ते ५ व ७ येथील शासन निर्णयान्वये रु. १४,००१.०० कोटी इतका निधी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आता संदर्भ क्र.८ येथील पत्रान्वये सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार या योजनेअंतर्गत पात्र कर्जखात्यांना लाभाची रक्कम थेट बँक खात्यामध्ये वितरीत करण्यासाठी रु. ४००० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी मागणी क्रमांक व्ही-०२, २४३५-इतर कृषीविषयक कार्यक्रम ६०-इतर, १०१ शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना, (००) (००) (०७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ (दत्तमत) (कार्यक्रम) (२४३५ ०२४२), ३३- अर्थसहाय्य या

लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी उर्वरित निधीतुन रु. ४०००.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ (कार्यक्रम) (२४३५ ०२४२), ३३ अर्थसहाय्य या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २०,५५२.०० कोटी इतका निधी मंजूर असून सद्यस्थितीत या लेखाशिर्षाखाली रु. ६५५१.०० कोटी इतका निधी शिल्लक आहे. सदर निधीपैकी रु. ४०००.०० कोटी (रुपये चार हजार कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च मागणी क्रमांक व्ही-०२, २४३५-इतर कृषीविषयक कार्यक्रम ६०-इतर, १०१ शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना, (००) (००) (०७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ (दत्तमत) (कार्यक्रम) (२४३५ ०२४२), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या वित्तीय वर्षांअंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून करण्यात यावा.

३. सदर तरतूद खर्च करण्यासाठी (V०००४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त सहाय्यक निबंधक (अंदाज व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, अधिन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. सदर निधी आहरण करुन वेळेत खर्च होईल याची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दक्षता घ्यावी. तसेच या बाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळोवेळी शासनास पाठवावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५९७/२०२६/व्यय-२, दिनांक २६.१०.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६१०२९१४४३०२२५४७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB17644257503716OFC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.10.29 14:44:24 +05'30'

(संतोष पाटील)
अपर निबंधक तथा सह सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, पुणे.
५) निवासी व लेखापरिक्षा अधिकारी, पुणे.

६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
७) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
९) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/ व्यय-२), / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव (कार्यासन १७-स), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (कार्यासन २-स).